Vol 4 Issue 10 July 2015

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

***Advisory Board***

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

**Review Of Research**
**ISSN 2249-894X**

**Impact Factor : 3.1402(UIF)**
**Volume - 4 | Issue - 10 | July - 2015**

# महात्मा गांधी आणि महिला सक्षमीकरण

प्रा. डॉ. सुजाता सुधीर गायकवाड

**प्रस्तावना**

महात्मा गांधीजींनी महिला सक्षमीकरणासाठी मोलाचे योगदान दिले आहे. महिला सक्षमीकरणासाठी समाजाला केवळ विचारच नव्हे तर कृतीशिलतेची जोड दिली होती. प्रस्तुत शोधनिबंधात स्त्रियांची प्राचीन व मध्ययुगीन काळातील स्थिती ब्रिटिशकाळात भारतीय समाजसुधारकांनी महिला उत्थानासाठी केलेले कार्य महत्मा गांधीजींचा स्त्रीविषयक दृष्टिकोण, न्याय व समतेच्या दृष्टिकोनातून विचार आणि महिला सक्षमीकरणाबाबत महात्मा गांधीजींचे योगदान इत्यादींचा अल्पसा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**SHORT PROFILE**

Dr. Sujata Sudhir Gaikwad is working as pro. in vidhyavardhini mahavidhyalaya, dhule.

## प्राचीन व मध्ययुगीन स्त्रियांची स्थिती

प्राचीन काळात समाजात स्त्रियांना मानाचे स्थान होते. वैदिककाळात मात्र स्त्रीला समाजात स्थान उरले नाही. मनूने तर स्त्रीला साखळदंडात बांधून ठेवल्याचे चित्र दिसते. याकाळात स्त्रीचे अस्तित्वच नष्ट करण्याचा प्रयत्न झाला. मध्ययुगात स्त्री ही फक्त भोग वस्तू बनली. अत्यंत किळस येण्याइतपत तिची अवस्था झाली होती. याचाच स्फोट होऊन आधुनिक युगात राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद विद्यासागर या बंगाली समाज सुधारकांनी स्त्रियांच्या दयनीय अवस्थेबद्दल प्रथमतः समाजात जागृती केली. महाराष्ट्रात तर महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले या दाम्पत्याचे कार्यतर विशेष उल्लेखनीय होते. त्यांच्या कार्याचा वारसा घेऊन छत्रपती शाहू महाराज, वि. रा. शिंदे, न्या. रानडे, कर्वे, आगरकर व लोकहितवादी यांच्या विचारातून व सुधारणा कार्यातून स्त्री पुढे आली. त्यातच ब्रिटिश राजवट स्त्रियांसाठी वरदानच ठरलेली दिसून येते. त्यांनी केलेला विधवा पुनर्विवाहाचा कायदा, सती प्रथा बंदी कायदा करून स्त्रियांच्या जीवनात मोलाची भर घातली. ब्रिटिशकाळात भारतात स्त्री शिक्षणाला चालना मिळाली. तसेच पुरोगामी विचारांची भारतीय समाजाला ओळख झाली. अशाप्रकारे स्त्रीला घरातून उंबरठ्यापर्यंत आणण्यासाठी 19 वे शतक उजाडले. त्यातच ताराबाई लिखित 'स्त्री–पुरुष तुलना' हा ग्रंथ स्त्रियांसाठी प्रेरणादायी ठरला.[1]

## महात्मा गांधीजींचा महिला विषयक दृष्टिकोण

'स्त्रीला समाज कसे वागवतो त्यावरून त्याची संस्कृती ठरत असते' असे महात्मा गांधींनी त्यांच्या मृत्यूच्या वीस दिवस अगोदर 'हरिजन' मध्ये लिहिले होते. 'स्त्री अबला आहे' असे मानणे चुकीचेच आहे. पाशवी सामर्थ्यात ती कमी पडत असेल पण आपल्या विचारांवर ठामपणे टिकून राहणे, आवश्यक तो त्याग करणे, अपत्यांची, नातेवाईकांची व इतरांची मनापासून सेवा सुश्रुषा करणे, संकटकाळी न डगमगता धिराने मुकाबला करणे हे गुण स्त्रियांना नैतिकदृष्ट्या पुरुषांपेक्षा अधिक असतात असे महत्मा गांधी मानत असत.[2]

## न्याय व समतेच्या दृष्टिकोनातून स्त्रीविषयक विचार

स्त्रियांनी असे मुळीच मानू नये की आपण पुरुषांची भोग लालसा करण्याचे साधन आहोत. स्त्री व पुरुष हे बरोबरीच्या स्थानाचे आहेत. ते दोघेही अर्धांग आहेत. दोघे मिळूनच पूर्णांक होतात हे पुरुषांप्रमाणे स्त्रीनेही लक्षात घेतले पाहिजे. आपले स्वातंत्र्य स्त्रीने जपले पाहिजे. अन्याय अत्याचार मग तो कौटुंबिक असो अथवा सामाजिक असो तो स्त्रीने सहन करू नये. अन्यायाविरुद्ध अहिंसक मार्गाने बंड करावे असे गांधीजी नेहमी सांगत असत. स्त्रीने पुरुषांशी प्रत्येक बाबतीत स्पर्धा करण्याची गरज नाही. आपली वैशिष्ट्ये लक्षात घेऊन तिने आपले क्षेत्र निवडले पाहिजे. कायद्याच्या दृष्टिने जे हक्क पुरुषाला

आहेत ते सर्व हक्क स्त्रीलाही असेल पाहिजेत असे गांधीजींचे ठाम मत होते. धर्मशास्त्रांनी स्त्रियांवर अनेक बंधने लादली. ती बंधने दूर अथवा दुरुस्त करण्यासाठी स्त्रियांनी पुढे आले पाहिजे. स्त्रीला पुरुषांच्या मदतीशिवाय स्वतंत्रपणे जीवन जगण्याचा हक्क आहे. पतीच्या संपत्तीत निम्मा वाटा असला पाहिजे अशा प्रकारे न्याय व समतेच्या दृष्टिने स्त्रियांच्या हक्कांची सुसंगत अशी मांडणी म. गांधीजींनी केलेली होती.[3] भारतीय समाजात महिला, दलित, भटके आदि वर्ग पिढ्यान्पिढ्या पिळवणूकीचे साधन मानले गेले. ज्या समाजात निम्म्याहून अधिक महिला असतील आणि त्या सगळ्या गुलाम असतील, प्रतिष्ठा हरवलेल्या असतील, जाळण्याचे आणि केवळ भोगण्याचे साधन असतील तर तो समाज कधीच प्रगती करू शकणार नाही असे मत गांधीजींचे होते. गांधीजी मानतात की भारत प्रगतीच्या बाबतीत सतत मागे पडला त्याचे कारण म्हणजे भारतीय समाजाने आपली निम्मे ताकद (स्त्रिया) कुजवली, धर्माच्या नावाने नासवून टाकली. अडगळीत टाकून दिली. कधी हुंड्यासाठी जाळले तर कधी स्त्री विधवा झाली. म्हणून पतीच्या चितेवर जाळून टाकले तर कधी तिचे मुंडण करून अंधारात फेकून दिले.[4] हे समाजातील वास्तव चित्र पाहून या महात्म्याचे हृदय हेलावत असे. म्हणून म. गांधीजींनी पडदा पद्धती, हुंडा पद्धती व बालविवाहाचे प्रथा यांना प्रखर विरोध केलेला दिसून येतो. तसेच त्यांनी आंतरजातीय विवाहाचे देखील समर्थन केल्याचे दिसून येते.

## *महिलांच्या सक्षमीकरणाबाबत गांधीजींची भूमिका व योगदान*

भारतीय समाजात स्त्रियांचे झालेले अधःपतन रोखण्यासाठी, महिला सक्षम बनविण्यासाठी महात्मा गांधींनी आपल्या विचारांना कृतीची जोड दिली. इंडियन ओपिनियनच्या 19 जानेवारी 1907 च्या अंकात 'स्त्री शिक्षण' या टिपणात गांधीजी लिहितात, 'जे स्वतःला सुधारक समजत असतात किंवा खाऊन पिऊन सुखी मानतात असे लोक मग ते हिंदू असोत, मुसलमान, पारशी अथवा ख्रिस्ती असोत आपल्या स्त्रियांकडे ते एखादे खेळणे किंवा स्वतःची भोगवासना पूर्ण करून घेण्याचे साधन म्हणून पाहात असतात.'[5] यात महात्मा गांधी स्त्रीला संपूर्ण मानवाचा दर्जा देवून सन्मान करा असे आवाहन करतांना दिसतात.

मनुष्याने आपल्या पत्नीकडे पर्यायाने स्त्रीकडे सार्वभौम विचारशील व्यक्ती म्हणून पहावे तरच महिला सक्षम होतील. 'सत्याचे प्रयोग' या आत्मचरित्रात गांधीजी लिहितात 'आज मी मोहांध पती नाही, शिक्षकही नाही, मनात आणल्यास कस्तुरबा, आज मला धमकी देऊ शकेल. आजही आम्ही कसलेले मित्रच आहोत.[6] यावरून गांधीजी स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन पुरुषांसमोर ठेवतांना दिसतात. स्त्रियांनी सक्षम होण्यासाठी नागरी व सार्वजनिक जीवनात सहभागी व्हावे. इंडियन ओपिनियन (28/12/1907) मध्ये गांधीजींनी लिहिलेला 'शूर स्त्रिया' या लेखात इंग्लंडमधील स्त्रियांच्या मताधिकार चळवळीचे कौतुक केले आहे. अफ्रिकेतील हिंदी लोकांना त्यांचे अनुकरण करण्याचे त्यांनी आवाहन केले आहे.[7] महिला सक्षमीकरणाबाबत गांधीजींचे असे मत होते की, जोपर्यंत भारतीय समाजात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार, हक्क दिले जात नाहीत तोपर्यंत खऱ्या अर्थाने भारतीय महिला सक्षम होऊ शकणार नाहीत. यासंदर्भात गांधीजी 21 मे 1931 च्या अंकात 'सती' या लेखात लिहितात, 'पत्नी ही पतीची गुलाम नव्हे, तर ती त्याची सहचारी, अर्धांगीणी व सखी आहे.' तीला त्याच्या बरोबरीचे समान हक्क आहेत. खऱ्या अर्थाने सहधर्मचारिणी आहे. त्यांची परस्पराविषयी व जगाविषयी कर्तव्ये समसमान व परस्पर अनुकूल असली पाहिजेत.[8]

भारतीय समाजातील पुरुषसत्ताक भांडवली व्यवस्थेमुळे स्त्रियांच्या सबलीकरणाबाबत सतत बाधा येत असल्याने या प्रश्नाकडे म. गांधीजींनी आपले लक्ष वेधले होते. सार्वजनिक क्षेताव्यतिरिक्त विवाहसंस्था व कुटुंबसंस्थेच्या अंतर्गत स्त्रियांचे सतत होणारे आर्थिक शारीरिक व लैंगिक शोषण थांबविणे महात्मा गांधीजींना आवश्यक वाटत होते. स्त्रीच्या तथाकथीत जीवनात स्त्रीला सुरक्षितता व स्वास्थ्य लाभणे आवश्यक असते म्हणून महात्मा गांधीजींची भूमिका लघु व कुटीर उद्योगांना प्रोत्साहन देण्याची होती आणि स्त्रीला कुटुंबात आर्थिक स्वावलंबन देणारी होती.[9]

'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे' अशा शब्दात शिक्षणाचे महत्त्व अधारेखित करण्यात आले आहे. स्त्रियांना शिक्षण दिले तर त्या सक्षम होतील असा गांधीजींना विश्वास होता. शिक्षणाद्वारे ज्ञानाच्या संपर्कात येऊन स्त्री ही सुरक्षित व भयमुक्त वातवरणात पुरुषांच्या बरोबरीने अर्थ उत्पादनाच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होईल. त्याशिवाय तिला सर्जनशिलता व स्वातंत्र्य गवसणार नाही असे गांधीजींना वाटत होते. महात्माग ांधी 'स्त्री–शिक्षण' या लेखात स्त्रियांच्या बाबतीत लिहितात, 'भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी निम्मे प्रजा जर अडाणी आणि दुसऱ्याच्या हातातले बाहुले राहिले तर त्यांची खरी संपत्ती कशी निकृष्ट बनत जाई ते सहज लक्षात येऊ शकेल.' यावरून स्त्री शिक्षण व स्त्रियांचा अर्थाउत्पादनातील सहभाग या विषयीचे गांधीजींचे मत स्पष्ट प्रतीत होते.

महात्मा गांधीजींचा स्त्री सक्षमीकरणाबाबतचा हा कृतीप्रवण विचार राष्ट्रीय चळवळीचा भाग म्हणून स्त्रियांच्या संदर्भात अतिशय क्रांतिकारक मानला जातो. अफ्रिकेतील लढ्यापासून महात्मा गांधीजींनी स्त्रियांना

चळवळीत स्थान देण्याची भूमिका स्वीकारली. परिणामी राष्ट्रीय चळवळीत स्त्रियांचा प्रचंड सहभाग वाढला. मॅडम कामा यांच्या दक्षिण अफ्रिकेतील कार्यास एका स्त्रीचे कार्य म्हणून प्रोत्साहन दिले. याचा परिणाम म्हणून उच्च–कनिष्ठ वर्ग, श्रीमंत–गरीब व विविध जातीधर्म यातील स्त्रियांनी राष्ट्रीय चळवळीत भाग घेतला. यावरून महात्मा गांधीजींनी केवळ महिला सक्षमीकरणाचे फक्त विचारच मांडले नाहीत तर त्या विचारांना कृतीची जोड दिली होती.[10]

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात भारतीय महिलांनी अलौकिक कामगिरी केली. या काळात परंपरेने जखडलेल्या समाजात स्त्रियांवर फार कडक बंधने होती. भारतातील थोर समाज सुधारकांनी आणि विचारवंतांनी स्त्री शिक्षणासाठी अहर्निश प्रयत्न केले. परंतु हे प्रयत्न शहरापुरते व मध्यमवर्गापुरतेच मर्यादित राहिले. गांधीजींनी स्त्रियांना स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होण्याचे आवाहन केले. त्यास प्रतिसाद म्हणून देशाच्या विविध भागातील स्त्रिया उत्स्फुर्तपणे स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाल्या. 'नही रखनी नही रखनी, ये जालीम सरकार नही रखनी' अशा घोषणा देत इंग्रज सरकारला आवाहन देऊ लागल्या होत्या. दारुच्या दुकानांसमोर निदर्शने करण्यासाठी पुढाकार घेऊ लागल्या. सराजनी नायडू, कमलादेवी चट्टोपाध्याय, हंसाबेन मेहता, अवंतिकाबाई गोखले, उर्मिलादेवी, कमला नेहरु यांच्यासह अगणित स्त्रियांनी स्वातंत्र्य चळवळीत अतूलनीय धैर्य दाखविले. यावरून याकाळात भारतातील स्त्रियांमध्ये सक्षमीकरण प्रतीत झालेले दिसते. मुंबईमध्ये बोरिबंदर जवळच्या मैदानात स्त्रियांच्या मिरवणुकीवर ब्रिटिश शिपायांनी अमानुषपणे लाठीहल्ला केला. परंतु स्त्री सत्याग्रहींनी तिरंगा ध्वज हातातून सोडला नाही. एवढ्या स्त्रिया धीट झालेल्या दिसून येतात. भारतीय स्त्रियांमधील स्वातंत्र्याची आकांक्षा अशा निर्भय रितीने प्रकट झालेली पाहून ब्रिटिश साम्राज्यवाद्यांचे मस्तक भडकून उठले. त्याचबरोबरीने त्यांचे धाबे दणाणले. त्यांनी अनेक स्त्रियांना दीर्घ मुदतीच्या तुरुंगवासाच्या शिक्षा ठोठावल्या. तुरुंगातही स्त्री सत्याग्रहींचा पदोपदी छळ करण्यात आला. तरीही या निर्भय स्त्रियांची मने कधीही खचली नाहीत. गांधीजींनी सुरू केलेला गायदेभंग सत्याग्रहाने भारताला निर्भय बनविले. अशाप्रकारे वर्षानुवर्षे घराच्या उबंरठ्याबाहेर न पडणाऱ्या स्त्रियांना महात्मा गांधीजींनी निर्भय बनवून जुलमाविरुद्धच्या लढ्यात रणांगणात उतरविण्याची किमया करून दाखविली. घरादाराचा, आपल्या कुटंबाचा आडोसा सोडून भारतीय समाजातील स्त्रिया देशासाठी सर्वस्वाचा त्याग करण्यास पुढे धजावल्या होत्या. पुढारलेल्या म्हणवणाऱ्या पाश्चिमात्य स्त्रियांना जे जमले नाही ते भारताच्या अशिक्षित म्हटल्या जाणाऱ्या स्त्रियांनी करून दाखविले.[11]

## निष्कर्ष

प्राचीन काळात मानाचे स्थान असणाऱ्या स्त्रियांचे वैदिक काळात अस्तित्वच नष्ट झाले होते. मध्ययुगात तर स्त्रियांची स्थिती अतिशय दयनीय होती. स्त्री एक उपभोगाची वस्तू म्हणून स्त्रीकडे पाहिले जात होते. ब्रिटिशकाळात मात्र स्त्री शिक्षणाला चालना मिळाली. अनेक समाजसुधारकांनी (राजा राममोहन रॉय पासून महात्मा फुले, शाहू महाराज, पंडिता रमाबाई पर्यंतच्या समाजसुधारकांनी) स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न केले. त्यामुळे स्त्रियांची वैचारिक प्रगती झाली. त्यामुळे स्त्री 19 व्या शतकापर्यंत घरातून उंबरठ्यापर्यंत आली. परंतु महात्मा गांधीजींनी स्त्री सक्षमीकरणाच्या विचारांना कृतीशिलतेची जोड देवून याच स्त्रियांना आपल्या घराचा उंबरठा ओलांडून रणांगणावर आणून समाजात महत्त्वाचे स्थान प्राप्त करून दिले होते.

## संदर्भग्रंथ


1) राऊत गणेश, ज्योती राऊत, महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, डायमंड पब्लिकेशन, पुणे, जुलै 2006. पृ. 15.

2) सुराणा पन्नालाल, गांधीजींची ओळख, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, जून 2004, पृ.26–27.

3) तत्रैव.

4) पारधी आर. एन., भारतीय स्त्रीजीवन व कर्तृत्व, वेदमुद्रा प्रकाशन, अमरावती, प्रथम आवृत्ती, 14 नोव्हेंबर 2005, पृ. 29.

5) इंडियन ओपिनियन, महात्मा गांधी यांचा लेख – स्त्रीशिक्षण, दिनांक 19 जानेवारी 1907.

6) मोहनदास करमचंद गांधी, सत्याचे प्रयोग (आत्मचरित्र), नवजीवन पब्लिशिंग हाऊस, अहमदाबाद, तिसरी आवृत्ती, मार्च 1969, पृ. 10–11.

7) इंडियन ओपिनियन, महात्मा गांधी यांचा लेख 'शूर स्त्रिया', दिनांक 28 डिसेंबर 1907.

8) तत्रैव, महात्मा गांधी यांचा लेख 'सती', दिनांक 21 मे 1931.

9) तत्रैव.

10) तत्रैव, महात्मा गांधी यांचा लेख 'स्त्री शिक्षण,' दिनांक 19 जानेवारी 1907.

11) प्रधान ग. प्र., गोष्ट स्वातंत्र्य लढ्याची, महाराष्ट्र शासन, पुणे, प्रथम आवृत्ती, नोव्हेंबर 1988, पृ. 49–51.





प्रा. डॉ. सुजाता सुधीर गायकवाड
विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com